Literacy for a Billion

Movie: Dhangad dhinga
Year: 1999

Song: Labad kolha houdat padla
Lyricist: Sudhir Moghe

लबाड कोल्हा हौदात पडला
बघता बघता घोटाळा झाला
घोटाळा झाला
अरे काय घोटाळा झाला
अहो लबाड कोल्हा हौदात पडला
बघता बघता घोटाळा झाला
हौदात होतं निळंच पाणी
रंगच त्याचा बदलून गेला
आता निळ्या पाण्यात पडल्यावर
निळाच होणार नाही का
गोष्ट पुढे तुम्ही ऐका
पप्पा पप्पा
गोष्ट पुढे तुम्ही ऐका ना
पप्पा पप्पा
गोष्ट पुढे तुम्ही ऐका

अरे नाचून भरपूर झालं
आता गोष्ट सांग ना काय ती
हौदात पडल्यावर काय झालं त्याचं
अरे सांगतोस ना

खोटारड्या त्या कोल्ह्यानी
मग केली शक्कल
कुई कुई करूनी
दणानले मग सारे जंगल
ससा माकड हरीण
सांबर जमले प्राणी
छाती फुगवून बोलू लागला राजावानी
गर्वाने तो उद्धट झाला

वाट्टेल ते हो बोलू लागला
गर्वाने तो उद्धट झाला
वाट्टेल ते हो बोलू लागला
एक एक थापा मारू लागला
खोटी बढाई करू लागला
हे वेडाच आहे तो
त्याला काय थापा मारायला जमणार
हां...
गोष्ट पुढे तुम्ही ऐका
पप्पा पप्पा
गोष्ट पुढे तुम्ही ऐका ना
पप्पा पप्पा
गोष्ट पुढे तुम्ही ऐका

सगळी गोष्ट आजच सांगणार
थोडी उद्या सांग
थोडी परवा सांग
बरं बाबा सांग ऐकतोय
काय करणार

वाघ सिंह ते
कुणीच नाही समोर माझ्या
आजपासूनी मीच खरा
जंगलचा राजा
माझीच सेवा तुम्हीच
आता करावयाची
माझ्यासाठी शिकार
तुम्ही आणावयाची
प्राण्यांना मग घामच फुटला

Literacy for a Billion

जो तो थरथर कापू लागला
वेडेचेत कशाला घाबरायचं ह
प्राण्यांना मग घामच फुटला
जो तो थरथर कापू लागला
तेवढ्यामध्ये आवाज झाला
कोल्हा दचकून सावध झाला
अहां अरे झालं तरी काय सांग ना
सांगतो की
गोष्ट पुढे तुम्ही ऐका
पप्पा पप्पा
गोष्ट पुढे तुम्ही ऐका ना
पप्पा पप्पा
गोष्ट पुढे तुम्ही ऐका

मग पुढे काय झालं
कोल्ह्याचं भांड फुटलं असणार
अरे थापा मारणं
म्हणजे सोप्प काम नाही
सगळ्यांना जमतं नाही माझ्यासारखं
करून गर्जना सिंहच आला तेथे थपकन
खोटारड्या त्या कोल्ह्याला

मग धरला झपकन
पाण्यामध्ये बुडवून
त्याला पुरता धुतला
बघता बघता
निळा रंग तो पार उतरला
उतरणारच
खोटं बोलला लबाड कोल्हा
बुरखा त्याचा पहा फाडला
फाडला अरे बाप रे
खोटं बोलला लबाड कोल्हा
बुरखा त्याचा पहा फाडला
अद्दल घडते खोटारड्याला
गोष्टीने या धडा शिकवला
धडा शिकवला
ह्यात काय धडा शिकवला
हाच की
मारू नये कुणी थापा
पप्पा पप्पा
मारू नका तुम्ही थापा
आता तरी
मारू नका तुम्ही थापा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*